संक्षिप्त

आज 'मोअर दॅन अ मिरॅकल' चित्रपट

नाशिक : शहरातील कुसुमाग्रज प्रतिष्ठान आणि दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने 'मोअर दॅन अ मिरॅकल' (१९६७) हा इटालियन चित्रपट कुसुमाग्रज स्मारकातील विशाखा सभागृहात शुक्रवारी संध्याकाळी सहा वाजता दाखविण्यात येणार आहे. हा चित्रपट एक परीकथा आहे. नववास्तववादी दिग्दर्शक फ्रान्चेस्को रॉझी यांचे दिग्दर्शन असून ओमार शरीफ आणि सोफिया लॉरेन यांच्या प्रमुख भूमिका आहेत. जास्तीत जास्त रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे मकरंद हिंगणे आणि दादासाहेब फाळके फिल्म सोसायटीचे प्रवीण मानकर यांनी केले आहे.
तू मिळविण्याची संधी आहे.

प्रा. किशोर पवार यांची अध्यक्षपदी निवड

नाशिक : येथील सार्वजनिक वाचनालय आणि नागरिक शिक्षक गौरव समितीच्या वतीने देण्यात येणाऱ्या आदर्श शिक्षक पुरस्कार निवड समितीच्या अध्यक्षपदी प्रा. डॉ. किशोर पवार, उपाध्यक्षपदी राजेंद्र निकम यांची निवड कार्यकारी मंडळाच्या वतीने करण्यात आली. मराठा विद्या प्रसारक समाज मंडळ या संस्थेच्या विविध महाविद्यालयांमध्ये प्रा. डॉ. किशोर पवार यांनी प्राचार्यपद भूषविले आहे. शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार त्यांना प्राप्त झाला आहे. आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी ३१ जुलैपर्यंत मुख्याध्यापक, प्राचार्य, संस्थाचालक यांच्यामार्फत शिक्षकांनी अर्ज सार्वजनिक वाचनालयाच्या कार्यालयात सादर करावयाचा आहे.

नागापूर उपसरपंचपदी प्रकाश जिरे

मनमाड : इंधन कंपन्यांच्या प्रकल्पामुळे राज्यातील मालमत्ता कराचे विक्रमी उत्पन्न मिळविणाऱ्या येथून जवळच असलेल्या नागापूर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी प्रकाश जिरे यांची चिठ्ठीद्वारे निवड करण्यात आली. सरपंच राजाभाऊ पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ही निवड करण्यात आली. ग्रामपंचायतीत थेट सरपंचांची निवडणूक झाल्यापासून उपसरपंचपदाचे आवर्तन ठरले होते. विद्याताई देवरे यांनी राजीनामा दिल्यानंतर उपसरपंचपदी चिठ्ठीव्दारे जिरे यांची निवड झाली.

वडाळा वीज उपकेंद्राचा मार्ग मोकळा

नाशिक महापालिकेकडून जागेसाठी नाहरकत; नाममात्र दराने जागा हस्तांतरीत

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : शहरातील वडाळा भागात प्रस्तावित वीज उपकेंद्रासाठी नाममात्र दराने जागा हस्तांतरीत करण्यास नाशिक महापालिकेकडून ना हरकत देण्यात आली आहे. प्रारंभी या जागेसाठी महापालिकेने २० लाख रुपये वार्षिक भाडे देण्याची मागणी केली होती. वीज उपकेंद्राअभावी इंदिरानगर, दीपालीनगर परिसरातील नागरिकांना समस्यांना तोंड द्यावे लागत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत वडाळा येथील नवीन उपकेंद्राच्या सर्व अडचणी दूर करण्यात आल्या.

वडाळा येथे नवीन उपकेंद्र प्रस्तावित आहे. महानगरपालिकेने लाखो रुपयांचे भाडे देण्याची मागणी केल्याने हा विषय रखडला होता. आता नाममात्र दराने जागा हस्तांतरीत करण्यास महापालिकेने सहमती दर्शविली आहे. बैठकीला महावितरण कंपनीचे अध्यक्ष लोकेश चंद्र हे उपस्थित होते. यावेळी आमदार देवयानी फरांदे यांनी इंदिरानगर भागात वारंवार विद्युत पुरवठा खंडित होत असल्यामुळे या ठिकाणी नवीन उपकेंद्राची निकड मांडली. चंद्र यांनी जागा हस्तांतरित करण्याची मागणी केली. उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी यांनी तत्काळ दूरध्वनीवरून नाशिक मनपाचे आयुक्त डॉ. अशोक करंजकर यांच्याशी संपर्क साधून त्यांना जागा हस्तांतरित करून देण्याचे आदेश दिले. या माध्यमातून इंदिरानगर परिसरातील वीज पुरवठ्याचा प्रश्न कायमस्वरूपी संपुष्टात येणार आहे.

द्वारका उपविभागाचेही विभाजन

द्वारका उपविभागाचे विभाजन करून भारतनगर आणि सांगवी येथील उपकेंद्राची क्षमता वाढविण्याची मागणी आमदार देवयानी फरांदे यांनी केली. द्वारका उपविभाग मोठा झाला असल्याने या ठिकाणी नियंत्रण ठेवणे अवघड होत असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. त्यामुळे या उपविभागाचे दोन भाग होणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. याबाबत तत्काळ कारवाई करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. भारतनगर आणि सांगवी येथील उपकेंद्राची क्षमता वाढवण्याची मागणी फरांदे यांनी केली. त्यावर संबंधित दोन्हीही उपकेंद्राची पाहणी करून जागा उपलब्ध असल्यास क्षमता वाढविण्याची कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले.

बोलावा विठ्ठल मैफिलीत भावस्वरांचे तरंग

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : विठ्ठलाच्या भावभक्तीचा, त्यांच्या माणुसपणाची महती सांगणाऱ्या अनोख्या अभंगानी 'बोलावा विठ्ठल' मैफिलीत रंगत आणली. आषाढीचा मेळा, वारी ही आनंदाची अनुभुती असते. याचीच प्रचिती या मैफिलीतून आली.

आषाढीनिमित्त पांडूरंगाच्या भावभक्तीची महती गायनातून सांगणाऱ्या 'बोलावा विठ्ठल' या अभंगवारी मैफिलीचे आयोजन विश्वास ग्रुप व महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या जलालपूर (नाशिक) शाखेतर्फे करण्यात आले होते. प्रसिद्ध शास्त्रीय गायिका सुनिता टिकारे यांनी गायन केले. साथसंगत नितीन पवार (तबला), व्यंकटेश ढवण (पखवाज), सुरज बारी (संवादिनी), अमित भालेराव (तालवाद्य) यांनी केली. सूत्रसंचालन कविता गायधनी यांनी केले. सावरकरनगर येथील आपत्ती व्यवस्थापन केंद्र सभागृहात झालेल्या मैफिलीची सुरूवात 'ज्ञानोबा माऊली तुकाराम'च्या गजरने झाली. त्यानंतर, बोले तैसा चाले त्याची, माझे सर्व सुख, अवघा तो शकुन, बोलावा विठ्ठल, रूप पाहता लोचनी, सुंदर ते ध्यान, अवघा रंग एक झाला यासारख्या अध्यात्म आणि जगण्याची नाळ जोडणार्या अभंगानी रसिकांना मंत्रमुग्ध केले.

टॅक्सी, रिक्षा योग्यता प्रमाणपत्राचे विलंब शुल्क रद्द करा

जिल्हा टॅक्सी मालक संघटनेची मागणी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : टॅक्सी व ॲटो रिक्षांच्या योग्यता प्रमाणपत्राला विलंब झाल्यास आकारले जाणारे शुल्क त्वरित रद्द करावे, अशी मागणी नाशिक जिल्हा टॅक्सी मालक संघटनेने प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाचे सचिव तथा जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्याकडे केली आहे.

संघटनेचे अध्यक्ष शरद शेलार, सचिव युसुफखान पटेल यांच्या नेतृत्वाखालील शिष्टंडळाने याबाबतचे निवेदन जिल्हा प्रशासनास दिले. करोना काळात प्रवासी वाहतूक पूर्णपणे बंद होती. त्यामुळे योग्यता प्रमाणपत्रासाठी विलंब झालेल्या वाहनास दंडात्मक शुल्क आकारू नये, याकडे टॅक्सी मालक संघटनेने लक्ष वेधले. टॅक्सी, रिक्षांचे परवाने बदली केल्यावर बदली परवान्याची मुदत सहा महिन्यांसाठी दिली जाते. सहा महिन्यांच्या काळात गरीब रिक्षा, टॅक्सी चालकांना अनेक आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागते. परवाना बाद होण्याची शक्यता असते. त्यामुळे बदली परवान्याची मुदत पाच वर्षांपर्यंत वाढविण्याचा आग्रह संघटनेने धरला आहे.

कुलकॅब टॅक्सी परवान्यावर वाहन नोंदविताना दोन वर्ष जुने वाहन नोंदविण्याची परवानगी आहे. परंतु, आज उबेर, ओला या प्रवासी वाहनांमुळे टॅक्सीचा व्यवसाय अडचणीत आला आहे. बँकेतून कर्ज काढून नवीन वाहन घेणेही अशक्य आहे. त्यामुळे कुलकॅब टॅक्सीच्या बदली वाहन परवान्यावर पाच वर्ष वाहन नोंदविण्यास परवानगी द्यावी आणि सीएनजी इंधनावर चालणारे वाहन बदली परवान्यावर नोंद केल्यास त्याची आयुर्मयादा २० वर्षापर्यंत दिली जावी, अशी मागणी संघटनेचे अध्यक्ष शरद शेलार यांनी केली आहे.

उद्या 'आशा भोसले-द सिंगिंग आयकॉन' मैफील

नाशिक : शहरातील आनंद वरखेडे यांच्या संकल्पनेतून 'आशा भोसले - द सिंगिंग आयकॉन' ही विनामूल्य मैफील शनिवारी आयोजित करण्यात आली आहे. संध्याकाळी सहा वाजता इंदिरानगर येथे बापू बंगल्याजवळील स्वर्णिमा सभागृहात ही मैफील होईल. आशा भोसले यांची गाजलेली गाणी तृप्ती देब, संपदा पिंपळखरे सादर करतील. संजय अडावदकर, मुकुंद जोशी स्वरसाथ करणार आहेत. अफलातून म्युझिक लव्हर्स व अक्षय फाउंडेशन यांचे सहकार्य लाभले आहे. सुरेश दिडमिशे निवेदन करतील. यावेळी तीन भाग्यवान रसिकांना सोनी पैठणी तर तिघांना आकर्षक भेटवस्तू मिळविण्याची संधी आहे.

स्वच्छ भारत अभियान चित्रकला स्पर्धा... :

मनमाड येथील के.आर.टी. विद्यालयात पानेवाडी येथील इंडियन ऑइल कंपनीच्या वतीने स्वच्छ भारत पंधरवडा अभियानातंर्गत इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आपला कलाविष्कार दाखविला.

जिल्ह्यात लवकरच सोनार समाजाची जनगणना

संस्थेच्या बैठकीत निर्णय

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : भारतीय सुवर्णकार समाज संस्थेतर्फे लवकरच नाशिक जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात सर्वशाखीय सोनार समाजाची जनगणना करण्यात येईल, अशी माहिती संस्थेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सुरेश बागूल यांनी दिली.

भारतीय सुवर्णकार समाज महाराष्ट्र प्रदेश संस्थेची सिडको येथे प्रदेश अध्यक्ष भास्करराव मैंद यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. इंदिरानगर, गोविंदनगर,पाथर्डी, मुंबई नाका परिसरात चालू असलेल्या सुवर्णकार समाजातील १८ पोटशाखांच्या जनगणनेचा आढावा घेण्यात आला. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. कल्पेश अहिरराव (देवळा), सुरेश दंडगव्हाळ (नांदगाव), यशवंत मोरस्कर (पंचवटी), यांची विभागप्रमुखपदी निवड करून त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच सिडको विभाग सचिव पदी दिगंबर नागरे, नांदगाव उपाध्यक्षपदी दत्तात्रेय वडनेरे, पंचवटी उपाध्यक्षपदी प्रकाश थोरात आणि भारतीय सुवर्णकार समाज महाराष्ट्र प्रदेश संस्थेच्या सहसचिवपदी बाळासाहेब सोनगीरकर यांची एकमताने निवड करण्यात आली.

खासदारांचा 'ब्रह्माकुमारी'तर्फे सत्कार

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : पंचवटीतील म्हसरूळ कलानगर येथे प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयच्या स्थानीय मुख्य सेवा केंद्राच्या प्रभू प्रसाद सभागृहात जिल्ह्यातील खासदार डॉ. शोभा बच्छाव आणि भास्कर भगरे यांचा राजयोगिनी ब्रह्माकुमारी वासंती दीदी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून दिल्ली येथील संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचे (डीआरडीओ) निवृत्त अधिकारी शिवसिंग उपस्थित होते. अध्यात्मिक उन्नतीने आपण कार्य केल्यास निश्चितच समाजसेवेला बळ मिळेल, असा सल्ला यावेळी वासंती दीदी यांनी दोन्ही खासदारांना दिला. खासदार बच्छाव यांनी, ब्रह्माकुमारी संस्थेचे कार्य महान असून दैनंदिन जीवनात तणावमुक्त राहण्यासाठी संस्थेच्या राजयोगा ध्यानधारणेचा खूप लाभ होतो, असे सांगितले. खासदार भगरे यांनी, ब्रह्माकुमारी संस्थेला सहकार्य करण्याचा प्रयत्न राहणार, असे सांगितले. कार्यक्रमात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात ब्रह्माकुमारी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या कौन्सलिंग व मेंटल हेल्थ या विषयावरील पदवी अभ्यासक्रमाच्या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. सूत्रसंचालन पूनम दीदी यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत ज्योती दीदी यांनी केले.

नाशिक येथे ब्रम्हाकुमारी आश्रमात वासंती दीदी यांच्या हस्ते दिंडोरीचे खासदार भास्कर भगरे यांना सन्मानित करण्यात आले.

येवला मतदारसंघात २३ कोटींहून अधिकच्या विकास कामांना मंजुरी

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : राज्याच्या पुरवणी अर्थसंकल्पातून येवला मतदारसंघात २३ कोटी ५१ लाखांच्या विकास कामांना मंजुरी मिळाली आहे. यामध्ये रस्ते व पुलांसह महसूल अधिकारी निवासस्थानाच्या कामांचा समावेश आहे.

राज्याच्या पुरवणी अर्थसंकल्पाच्या माध्यमातून येवला तालुक्यातील प्रमुख राज्यमार्गावरील नांदेसर-आडगाव-चोथवा-उंदीरवाडी-बोकटे खामगाव तसेच जिल्हा मार्ग ८० मध्ये सुधारणा करण्यासाठी दोन कोटी ५० लाख, अनकाई- कुसमाडी- नगरसूल-अंदरसूल-पिंपळगाव जलाल या राज्य महामार्ग ४५१ ची सुधारणा करण्यासाठी पाच कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी मिळाली आहे. निफाड तालुक्यातील लासलगाव येथील लासलगाव- पाटोदा रस्त्यावरील राज्य महामार्ग १४ वरील पुलासाठी चार कोटी ५० लाख, गाजरवाडी ते नांदूरमध्यमेश्वर ग्रामीण महामार्ग १२३ या रस्त्यावरील पुलासाठी दोन कोटी, वनसगाव-थेटाळे-कोटमगाव प्रमुख जिल्हा मार्ग १७४ या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करण्यासाठी तीन कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी मिळाली आहे. येवला येथील शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुसज्ज निवासस्थानांची व्यवस्था करण्यासाठी सहा कोटी ५१ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

आजपासून रामराव तथा पोपटरावजी हिरे स्मृती व्याख्यानमाला

नाशिक : येथील ग्रामोदय शिक्षण संस्थेच्यावतीने भाजपचे ज्येष्ठ नेते, ग्रामोदय शिक्षण संस्थेचे संस्थापक रामराव तथा पोपटराव हिरे यांच्या स्मृतीदिनानिमित्त १२ ते १४ जुलै या कालावधीत सायंकाळी सहा वाजता व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यावाचस्पती विवेक घळसासी यांची विविध विषयांवर व्याख्याने होणार आहेत. गंगापूर रस्त्यावरील रावसाहेब थोरात सभागृहात ही व्याख्यानमाला होणार आहे. पहिल्या दिवशी म्हणजे शुक्रवारी अग्निशिखा स्त्रीया, शनिवारी तरुणांसाठी प्रेरक मंत्र आणि रविवारी 'मोदीजी लढाई जिंकली पण युद्ध जिंकायचे आहे' या विषयावर व्याख्यान होईल.

मूकबधीर वधू-वर मेळाव्यात पालकांचे प्रबोधन

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : महाराष्ट्रासह बाहेरील राज्यातील मूकबधिर वधू-वर परिचय मेळावा शहरात प्रथमच काशी माळी मंगल कार्यालयात झाला. विशेष म्हणजे या मेळाव्याचे आयोजन मूकबधिरांनीच केले होते.

मेळाव्यात प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ समाजसेवक डॉ. मुक्तेश्वर मुनशेट्टीवार उपस्थित होते. मेळाव्यात मृणाल बाविस्कर यांनी प्रास्ताविकातून मूकबधिर युवक - युवतींच्या समस्यांचा आढावा घेतला. विशेष गरजा असलेल्या युवक व युवतींचे विवाह होण्यास फार अडचणी येतात. माळी समाजातील कर्णबधीर युवक - युवतींनी एकत्र येऊन वधू वर मेळावा घेऊन आपले प्रश्न आपणच सोडवू व पालकांना आनंद देऊ, या भावनेने हा मेळावा आयोजित केला असून महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड व राजस्थान येथून दोनशेपेक्षा अधिक वर-वधू पालकांसह उपस्थित राहिल्याचे सांगितले.

यावेळी डॉ. मुनशेट्टीवार यांनी,

मूकबधिरांमध्ये कला, क्रीडा आणि कौशल्य हे सर्व गुण असून समाजाने त्यांना समजून घेणे गरजेचे असल्याचे सांगितले. मूकबधिर मुला-मुलींच्या पालकांनी जात पात न बघता मूकबधिर हाच समाज असल्याचे समजून त्यातून आपली सून, जावई निवडल्यास विवाहाचा प्रश्न सुटू शकतो, असे सांगितले. आयोजक अध्यक्ष सोमनाथ माळी यांनी, समुपदेशनाची आवश्यकता असल्यास ते देण्याचे आश्वासनही दिले. मेळावा यशस्वी होण्यासाठी माळी समाजाचे अध्यक्ष तथा उद्योजक बाजीराव तिडके यांनी सहकार्य केले. मेळाव्यात काही पालकांनी तसेच विवाह इच्छुक मुला-मुलींनी मनोगत व्यक्त केले.

HDFC BANK We understand your world

एचडीएफसी बँक लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : एचडीएफसी बँक हाऊस, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई-४०० ०१३
डिपार्टमेन्ट फॉर सोशल ऑपरेशन : पेनिन्सुला बिझनेस पार्क, बी टॉवर, चौथा मजला, डॉन मिल्स कम्पाऊण्ड, गणपतराव कदम मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई-४०० ०१३

ताबा सूचना

दी सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेन्ट रुल्स, २००२च्या नियम ८(१) सोबत वाचावयाच्या परिशिष्ट IV नुसार)

ज्याअर्थी, एचडीएफसी बँक लि.चे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी दी सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (२००२चा ५४)नुसार आणि दी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या नियम ९ सोबत वाचावयाच्या कलम १३(१२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांची अंमलबजावणी करताना **३०.०३.२०२२ दिनांकित** डिमाण्ड नोटीस जारी करून कर्जदार **i) मेसर्स कैलेश लक्ष्मण शिंदे, ii) श्री. दीपक लक्ष्मण शिंदे, iii) श्री. संदीप लक्ष्मण शिंदे, iv) श्रीमती नंदा लक्ष्मण शिंदे, श्रीमती पर्वताबाई लक्ष्मण शिंदे, v) श्री. दत्तात्रय कारभारी शिंदे** यांना उक्त सूचना मिळावयाच्या तारखेपासून ६० दिवसांत **१८.११.२०११ रोजीनुसार रु. १,४४,३७,८३४/- (रुपये एक कोटी चव्वेचाळीस लाख सदतीस हजार आठशे चौतीस फक्त)** असलेल्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड **१९.११.२०११ पासून प्रभावाने त्यावरील व्याजासह** करण्यास फर्माविले.

कर्जदारांनी रकमेची परतफेड न केल्यामुळे कर्जदारांना व सामान्यतः जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, उक्त नियमांच्या नियम ९ सोबत वाचावयाच्या उक्त अधिनियमाच्या कलम १३(४) नुसार त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांची अंमलबजावणी करून निम्नस्वाक्षरीकारांनी येथील निम्नवर्णित मालमत्तेचा लाक्षणिक ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदारांना आणि सामान्यतः जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की, या मालमत्तेचा खरेदी-विक्री व्यवहार करू नये व या मालमत्तेचा कोणताही खरेदी-विक्री व्यवहार **१८.११.२०११ रोजीनुसार रु. १,४४,३७,८३४/- (रुपये एक कोटी चव्वेचाळीस लाख सदतीस हजार आठशे चौतीस फक्त)** आणि व्यय व आकार इत्यादी रकमेकरिता **एचडीएफसी बँक लि.** यांच्या भारासापेक्ष राहील.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

अ. क्र.	मालमत्तेचे वर्णन	मालक	मालमत्तेचा प्रकार
१	तालुका जिल्हा नाशिकमधील ओझर गावच्या, रु. ४.९६ने करनिर्धारित, एच-०-४९आर + पीके एच ०-५३ क्षेत्रफळाच्या, त्रिमूर्ती ग्रेप्स एक्स्पोर्ट्स म्हणून नाव असलेल्या इमारत मालमत्तेच्या (कोल्ड स्टोअरेज) जमिनीचे सर्व तुकडे आणि खंड. सीमाबद्धता : उत्तरेला- गट क्र. २४५२, दक्षिणेला- गट क्र. २४५१/२, पूर्वेला- गट क्र. २४५१, पश्चिमेला- गट क्र. २४४०.	श्री. कैलाश लक्ष्मण शिंदे, श्री. दीपक लक्ष्मण शिंदे, श्री. संदीप लक्ष्मण शिंदे व श्रीमती पर्वताबाई लक्ष्मण शिंदे यांचे मालकीचे.	**व्यापारी गोदाम**

प्रतिभूत मत्ता सोडवून घेण्याकरिता उपलब्ध असलेल्या वेळेच्या बाबतीत अधिनियमाच्या कलम १३च्या पोट-कलम (८)च्या उपबंधांकडे कर्जदाराचे लक्ष वेधण्यात येत आहे.

स्थळ : नाशिक, महाराष्ट्र
दिनांक : ०६.०७.२०२४

एचडीएफसी बँक लि.करिता
(अश्विन एन. इंदुलकर)
मोबाइल : ९३२३१३८७१६

kotak

कोटक महिंद्रा बँक लिमिटेड
कॉर्पोरेट आयडेन्टिटी नं. : एल६५११०एमएच१९८५पीएलसी०३८१३७
नोंदणीकृत कार्यालय : २७ बीकेसी, सी२७, 'जी' ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू), मुंबई-४०० ०५१, महाराष्ट्र.
प्रादेशिक कार्यालय : अदमास प्लाझा सीएसटी रोड, कोलिव्हेरी व्हिलेज, कुंची कुर्वे मार्ग, कलिना, सांताक्रुझ (पू), मुंबई-४०० ०९८, महाराष्ट्र

लिलाव-नि-विक्रीकरिता जाहीर सूचना

कृपया ही नवीन सूचना समजण्यात यावी, जी याद्वारा **आम जनतेस** आणि विशेषकरून ऋणको/ सह-ऋणको हमीदारांना देण्यात येत आहे की, **''कोटक महिंद्रा बँक लिमिटेड''**च्या **प्राधिकृत अधिकारी**कडे गहाण असलेल्या याखाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा **प्रत्यक्ष ताबा ''कोटक महिंद्रा बँक लिमिटेड''**च्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्री **''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे काही आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे''** या तत्त्वावर करण्यात येणार आहे. प्रस्ताव स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता, जिचा तपशील याखाली देण्यात आला आहे, निम्नस्वाक्षरीकारांद्वारा आमचे ई-लिलाव सेवा-पुरवठाकार, **मेसर्स सी१ इंडिया प्रा. लि.** म्हणजेच **www.c1india.com** या वेब पोर्टलद्वारा ऑनलाइन सादर करण्याकरिता मागविण्यात आले आहेत. विक्रीकरिता असलेल्या स्थावर मालमत्तेचा तपशील याखाली देण्यात आला आहे :

ऋणको / हमीदार / गहाणकाराचे नाव	मागणी सूचना तारीख व रक्कम	स्थावर मालमत्तेचे वर्णन	
लोन अकाऊन्ट नं. : आयएलएपी४३७७५ १. **श्री. राजाराम त्रिंबक संगमनेर (ऋणको)** २. **श्रीमती ललिता राजाराम संगमनेर (सह-ऋणको)** ३. **श्री. विजय त्रिंबक संगमनेर (सह-ऋणको)**	**मागणी सूचना दिनांकित** २८.०७.२०२१ **₹ २३,५८,९२७.९८ (रुपये तेवीस लाख अठ्ठावन्न हजार नऊशे सत्तावीस व पैसे अठ्ठ्याण्णव फक्त)** २८.०७.२०२१ रोजीप्रमाणे	फ्लॅट नं. ४, पहिल्या मजल्यावरील, ६००.०० चौ.फू., ५५.७४ चौ.मी. याशी तुल्य, ''अक्षरधाम अपार्टमेन्ट'मधील, नाशिक गावठण येथे पडून असलेला व असलेले, **''रामकृपा''** म्हणून ज्ञात असलेल्या वस्तीतील, पेठ रोडजवळ, नाशिक म्युनिसिपल कॉर्पोरेशन, नाशिकच्या मर्यदित, ता. व जि. नाशिक आणि नोंदणी जिल्हा व उप-जिल्हा नाशिकच्या मर्यदित, धारण केलेला सर्व्हे ९९-ए/१ व सीटीएस नं. ५८७१/१/१सी-१ व ५८७१/१/१सी-२, अनुक्रमे **मोजमापाचे** १०१६.२० चौ.मी., नाशिक-४२२ ००३.	
राखीव किंमत	**इसारा रक्कम ठेव (इरठे)**	**स्थावर मालमत्तेच्या पाहाणीची तारीख**	**लिलावाची तारीख व वेळ**
₹ १६,६४,५५०/- (रुपये सोळा लाख चौसष्ट हजार पाचशे पन्नास फक्त)	**₹ १,६६,४५५/- (रुपये एक लाख सहासष्ट हजार चारशे पंचावन्न फक्त)**	२४.०७.२०२४ रोजी दु. १२.०० ते दु. ०१.००	०२.०८.२०२४ रोजी स. ११.०० ते दु. १२.००
प्रस्ताव / इरठेच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख		**०१.०८.२०२४ रोजी सायं ०५.०० वा.**पर्यंत	
बोली वृद्धी रक्कम		**₹ १,००,०००/- (रुपये एक लाख फक्त)**	

विक्रीच्या महत्त्वाच्या शर्ती व अटी : (१) लिलावाचे आयोजन बोली कागदपत्रांच्या पुढील शर्ती व अटींनुसार व त्यात नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार करण्यात आले आहे. बोलीदार बोली कागदपत्रे, ई-लिलावाकरिता ठेवण्यात आलेल्या सुरक्षित मत्तेचा सविस्तर तपशील आणि बोली प्रपत्रे, जी ऑनलाइन सादर करण्यात येणार आहेत, याकरिता आमचे ई-लिलाव सेवा-पुरवठाकार, **मेसर्स सी१ इंडिया प्रा. लि.** म्हणजेच **https://www.bankeauctions.com** या वेबसाइटला भेट देऊ शकतील; **(२)** सर्व इच्छुक खरेदीदार/ बोलीदारांनी व नमूद केल्यानुसार **https://www.bankeauctions.com** या वेब पोर्टलवर त्यांच्या नावांची नोंद करणे आवश्यक आहे आणि पूर्वोक्त तारीख व वेळेत ई-लिलावामध्ये स्वतः सहभागी होण्याकरिता विनामूल्य यूजर आयडी व पासवर्डची निर्मिती करावी; **(३)** कोणतीही चौकशी, माहिती, सहाय्य, प्रक्रिया आणि ई-लिलावावरील ऑनलाइन प्रशिक्षण याकरिता भावी बोलीदार संपर्क साधू शकतील : **मेसर्स सी१ इंडिया प्रा. लि.** आमचे ई-लिलाव सेवा-पुरवठाकार विभाग- **श्री. विनोद चौहान, टेलि. क्र. :** +९१ ७२९१९७११२४, २५, २६, **मोबा. नं. : ९८१३८८७९३१ व ई-मेल आयडी : delhi@c1india.com** द्वारा **व support@bankeauctions.com**; **(४)** प्राधिकृत अधिकारींना असलेले उत्तम ज्ञान व माहितीनुसार मालमत्तेवर तेथे कोणताही भार नाही. तथापि, स्वारस्य असलेले बोलीदार वर नमूद केल्यानुसार किंवा भेटीची पूर्ववेळ ठरवून अन्य कोणत्याही तारखेस व वेळेत मालमत्ता व तिच्या कागदपत्रांची पाहणी करू शकतील आणि ते त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी भार, ई-लिलावाकरिता ठेवण्यात आलेल्या मालमत्तेचा नामाधिकार तसेच मालमत्तेस प्रभावी ठरणारे दावे/ हक्क/ देणी यांबाबत त्यांनी स्वतः स्वतंत्र चौकशी करावी. ई-लिलाव जाहिरात **''केएमबीएल''**शी कोणतीही बांधिलकी किंवा कोणतेही प्रतिनिधित्व करीत आहे असा अर्थबोध होत नाही. मालमत्तेची विक्री **''केएमबीएल''**ला ज्ञात असलेल्या किंवा ज्ञात नसलेल्या सर्व विद्यमान व भावी भारांसह करण्यात येत आहे. **प्राधिकृत अधिकारी/ सुरक्षित धनको** त्रयस्थ व्यक्तीचे **दावे/ हक्क/ देणी** यांकरिता कोणत्याही परिस्थितीत जबाबदार असणार नाहीत; **(५)** ई-लिलावात भाग घेण्याकरिता स्वारस्य असलेले खरेदीदार/ बोलीदारांना वर विनिर्दिष्ट केल्यानुसार पॅन कार्ड, आधार कार्ड, निवासी पत्त्याचा पुरावा, कंपनी असल्यास बोर्ड रिझोल्यूशन्स आणि पत्ता याच्या स्वयंसाक्षांकित प्रतींसह मुंबई येथे देय **''कोटक महिंद्रा बँक लिमिटेड''**च्या नावे डिमाण्ड ड्राफ्टद्वारा वर नमूद केल्यानुसार सुरक्षित मत्तेच्या व्याजमुक्त परतावा इसारा रक्कम ठेवीच्या (इरठे) प्रदानाचा तपशील वेब पोर्टलमध्ये (**https://www.bankeauctions.com**) सादर करावा लागणार आहे/ अपलोड करावा लागणार आहे.

ऋणको/ गहाणकार/ हमीदारांना याद्वारा या सूचनेच्या तारखेपासून **पंधरा दिवसां**च्या आत आतापर्यंतचे व्याज व खर्चासह वर नमूद केल्यानुसार देणींचे प्रदान आणि दायित्व पूर्णतः सोडविण्याकरिता **सरफेसी ॲक्टच्या रुल ६(२), ८(६) व ९(१) अंतर्गत १५ दिवसीय सूचना** देण्यात आली आहे, त्यास असमर्थ ठरल्यास वर नमूद केल्यानुसार सुरक्षित मत्तेची विक्री करण्यात येणार आहे. जर इंग्लिश व स्थानिक वृत्तपत्रांतील विक्री सूचनेच्या प्रसिद्धीदरम्यान कोणतीही विसंगती आढळून आल्यास स्थानिक वृत्तपत्रातील जाहिरातीऐवजी इंग्लिश वृत्तपत्रातील जाहिरात ग्राह्य धरावी आणि ती अंतिम प्रत म्हणून विचारात घेण्यात येईल, अशाप्रकारे अर्थाबाबत संदिग्धता काढून टाकली जाईल. जर ऋणको/ हमीदार/ गहाणकार बँकेला विक्रीच्या तारखेपूर्वी संपूर्ण देणींचे प्रदान करीत असल्यास, लिलाव स्थगित करण्यात येईल.

विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता कृपया **https://www.kotak.com/en/bank-auctions.html** या आमच्या कार्यालयीन **वेबसाइट**ला भेट द्यावी किंवा वर नमूद केलेल्या बँकेच्या प्रादेशिक कार्यालयाकडील **प्राधिकृत अधिकारी श्रीमती श्वेता कामथ @ ८९